C.R-No-65/06

**रास्त भाव दुकानांचे प्राधिकारपत्र मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा पुरवठा अधिका-यांना प्रदान करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :साविव्य १०९९/प्र.क्र.८५९९/नापु २८**
**मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२,**
**दिनांक :- २० जून , २००६.**

वाचा :- १) शासन निर्णय ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
क्रमांक :साविव्य १०९९/प्र.क्र.८५९९/नापु २८, दिनांक १५ जानेवारी २०००,
२) शासन निर्णय ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
क्रमांक :साविव्य १०९९/प्र.क्र.८५९९/नापु २८, दिनांक २७ जून २०००
३) शासन निर्णय ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
क्रमांक :साविव्य १०९९/प्र.क्र.८५९९/नापु २८, दिनांक: १८ एप्रिल, २००१
४) शासन निर्णय ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
क्रमांक :साविव्य १०९९/प्र.क्र.८५९९/नापु २८, दिनांक १६ सप्टेंबर,२००५.

**: शासन निर्णय :**

१. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ च्या नियम ३ अन्वये रास्त भाव दुकानांचे प्राधिकारपत्र मंजूर करण्याचे अधिकार शासन किंवा जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदर आदेशाच्या नियम २(क) अन्वये जिल्हाधिकारी या संज्ञेत अन्नधान्य वितरण अधिकारी, सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी आणि राज्य शासन किंवा जिल्हाधिकारी या संबंधात ज्यांना प्राधिकृत करतील अशा अधिका-यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर आदेशाच्या नियम ३ अन्वये जिल्हाधिका-यांनी त्यांच्या स्तरावर रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र मंजूर करण्याचे अधिकार उप विभागीय अधिका-यांना प्रदान करण्याचे आदेश संदर्भाधीन दिनांक १६ सप्टेंबर, २००५ च्या शासन निर्णयान्वये देण्यांत आले होते.

२. शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर,२००५ अन्वये रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र मंजूर करण्याचे दिलेले अधिकार अधिक्रमित करुन आता हे अधिकार सर्व संबंधित **जिल्हा पुरवठा अधिकारी** यांना प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. मात्र, शासन निर्णय दिनांक २७ जून, २००० अन्वये नागरी क्षेत्रासाठी अन्नधान्य वितरण अधिका-यांना देण्यात आलेल्या अधिकारात कोणताही बदल करण्यात येत नाही. सर्व संबंधित जिल्हा पुरवठा अधिका-यांना हे अधिकार प्रदान करण्याविषयी संबंधित जिल्हाधिका-यानी कार्यवाही

ह आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - SB
आवक नं.
- 1 JUL 2006
कार्यविवरण नं. -
प्र.लि. नि.उ.जि. जिल्हाधिकारी

( ना.ल.तडोसे )
उप सचिव,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

33302 (660)
33302 (9000)